| | |
|---|---|
| MHKO030042102020 | दाखल तारीख – १८.०६.२०२० |
| | नोंदणी तारीख – १८.०६.२०२० |
| | निकाल तारीख – १३.०८.२०२६ |
| | कालावधी – वर्षे महिने दिवस<br>०६ ०२ २५ |

**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी मंगल दीपक कश्यप)**

**न्यायनिर्णय घोषीत दिनांक १३ ऑगष्ट, २०२६.**

**नियमित फौजदारी खटला क्र.१२४४/२०२०** **निशाणी क्र.२१/ब**

**गुन्हा नोंद क्र.३५९/२०१९, पोलिस ठाणे शाहुपूरी, कोल्हापूर.**

**(भारतीय दंड विधान कलम ४०६ व ४२० अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | -- | **महाराष्ट्र शासन तर्फे<br>शाहूपुरी, पोलीस ठाणे, कोल्हापूर.** |
| अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | -- | **श्री. ए. एन. डोईफोडे.** |
| **आरोपी** | -- | **महेश मंजुनाथ रोटी,**<br>वय : ३० वर्षे, धंदा : मजुर,<br>रा. कंब्यापुर ता. कलगटकी, राज्य कर्नाटक. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | -- | **श्री.ए. एम. चव्हाण.** |

**भाग –ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये )**

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | १०.०४.२०१९ |
| २. | प्रथम खबर | १५.०६.२०१९ |
| ३. | दोषारोप पत्र दाखल तारीख | १८.०६.२०२० |
| ४. | दोषारोप तारीख | १८.०९.२०२३ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | ०६.०८.२०२६ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | -- |
| ७. | निकाल तारीख | १३.०८.२०२६ |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

**<u>आरोपी विषयी माहिती</u>**

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी दंड संहितेच्या कलम ४२८ साठी खटल्यादरम्यान ताब्यात घेतलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | महेश मंजुनाथ रोटी | १८.०८.२०१९ | २१.०८.२०१९ | भा. द. वि. सं. कलम ४०६, ४२० | निर्दोष मुक्तता | .... | .... |

**<u>भाग -क</u>**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये )**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**<u>१) अभियोग पक्ष/बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>**

**(अ) <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी</u> -**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | फिरोज अमिन मुलाणी (अ.सा.१) | फिर्यादी(नि.१८) |

(ब) - बचाव पक्षातर्फे साक्षीदार - निरंक
(क) - न्यायालया तर्फे साक्षीदार - निरंक

**२) अभियोग पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालयामार्फत निशाणी ( फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

**(अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी -**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १२ | फिर्याद |

**(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी -**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**(क) न्यायालयातर्फे निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा) -**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**(ड) भौतिक वस्तू -**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | |

## न्या य नि र्ण य

**(घोषित दिनांक १३.०८.२०२६)**

आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ४०६ व ४२० खालील गुन्ह्यासाठी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे** –

२. फिर्यादी फिरोज अमीन मुलाणी याने दिनांक १५.०६.२०१९ रोजी पोलिस स्टेशनला हजर राहून फिर्याद दिली व त्यामध्ये असे नमूद केले की, फिर्यादीच्या बहिणीचे सासरे नजीर आप्पालाल तहसिलदार यांच्या नावे असलेली मारुती ओमणी गाडी क्र. एमएच–१२–पीए–६८८९ ही त्याच्याकडे वापरण्यासाठी

होती. कधी कधी फिर्यादी सदरची कार भाडयाने देत असे. कोल्हापूर येथील प्रविण थोरात यांना देखील सदरची कार ते मागतील त्यावेळी भाडयाने देत असे. प्रविण थोरात यांना डिसेंबर–२०१७ पासून ते ४ एप्रिल २०१८ पर्यंत दरमहा रु.४,०००/– प्रमाणे सदरची कार भाडयाने दिली होती. एकूण १६,०००/– भाडयाच्या रक्कमेपैकी त्यांनी ८,०००/– रुपये फिर्यादीला दिले होते. उर्वरित रक्कमेबाबत विचारले असता देतो असे तो म्हणत होता.

**३.** दिनांक ०९.०४.२०१८ रोजी सदरची कार प्रविण थोरात याने रुईकर कॉलनी, कोल्हापूर येथे आणून सोडली व निघून गेला. त्याचा मित्र महेश रोटी आल्यानंतर त्याला गाडी दे असे फिर्यादीला सांगून तो निघून गेला. त्यानंतर दिनांक १०.०४.२०१८ रोजी महेश रोटी फिर्यादीच्या घरी आला त्यावेळी फिर्यादी घरी नव्हता. फिर्यादीची पत्नी मलिका ही घरी होती. तिने फिर्यादीला फोन केला आणि महेश रोटी कार घेण्यासाठी आला आहे त्याला कार देवू काय असे विचारले. फिर्यादीने त्याच्या पत्नीला महेश रोटी याला कार देण्यास सांगितले. महेश रोटी हा सदरची कार घेवून निघून गेला.

**४.** दिनांक १८.०४.२०११ रोजी प्रविण थोरात हा फिर्यादीकडे गेला आणि ओमनी कार कुठे आहे असे विचारले. सदरची कार महेश रोटी हा घेवून गेला आहे असे फिर्यादीने सांगितले. त्यावर महेश रोटी हा सदरची कार त्याच्याकडे घेवून आला नाही असे फिर्यादीला सांगितले. फिर्यादीने महेश यास फोन लावला आणि गाडी कुठे आहे असे विचारले, त्यावेळी त्याने सांगितले की, सदरची कार ही त्याने त्याची बहिण अंजली विभुते हिच्या घरी तारदाळ येथे लावलेली आहे. तारदाळ ता. हातकणंगले येथे जावून पहाणी केली असता सदरची कार मिळून आली नाही. महेश रोटी याला पुन्हा फोन करुन विचारले असता तो गाडी घेवून हुबळी येथे आला आहे असे सांगितले. त्यावेळी महेश रोटी म्हणाला की, त्याचा हिशोब मिटवा, प्रविण थोरात याच्याकडे असलेले त्याचे कामाचे पैसे देण्यास सांगा त्यावेळी गाडी तुम्हाला

देतो. त्यानंतर फिर्यादीने प्रविणला सांगितले असता तो महेशला कोणतेही पैसे देणार नाही असे त्याला सांगितले. फिर्यादीने प्रविणकडे स्वतःची कार मागितली. महेश रोटी याने सदरची कार अनेक वेळा फोन करुन देखील परत दिली नाही. महेश रोटी यांनी सदरची कार कोठे तरी भंगारात विक्री केली आणि त्याबदली दुसरी गाडी देतो असे सांगून फिर्यादीची फसवणूक केली. सबब, फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

**५.** वरील फिर्यादीवरुन शाहुपुरी पोलिस ठाणे येथे गु.र.नं ३२०/२०१९ भारतीय दंड संहीतेमधील कलम ४०६, ४२० खाली गुन्हा नोंदविण्यात आला आणि तपास ए. बी. गाडीवड्ड, पोलिस कॉन्स्टेबल यांच्याकडे देण्यात आला. तपासी अंमलदाराने तपासकामी साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपास पुर्ण झाल्यावर आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**६.** माझ्या पुर्वाधिका–यांनी दोषारोप(नि.१३) दिनांक १८.०९.२०२३ रोजी आरोपीविरुध्द दोषारोप निश्चित केला. सदर दोषारोपातील सर्व मजकूर आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचुन दाखवण्यात आला असता, त्याने गुन्हा नाकबुल करुन, खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दाखवली, त्यामुळे खटला पुढे चालविण्यात आला.

**७.** मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १०.०४.२०१९ रोजी रुईकर कॉलनी चव्हाण गल्ली कोल्हापूर येथे आरोपीने ओमनी कार क्र.एमएच–१२–पीए–६८८९ ही फिर्यादीने विश्वासाने आरोपीला सोपविली असता आरोपीने हेतुपुरस्सर त्याचा स्वतःसाठी वापर करुन ती भंगारमध्ये विक्री केली आणि | ... **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | त्याद्वारे फौजदारीपात्र न्यासभंग करुन त्यानुसार भारतीय दंड विधान कलम ४०६ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | |
| २. | वैकल्पिकरित्या दिनांक १०.०४.२०१९ रोजी रुईकर कॉलनी चव्हाण गल्ली कोल्हापूर येथे आरोपीने फिर्यादीची ओमनी कार क्र.एमएच–१२–पीए–६८८९ फिर्यादीची फसवणूक करण्याच्या उद्देशाने भंगारमध्ये विक्री केली आणि त्यानुसार भारतीय दंड विधान कलम ४२० नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **--- नाही.** |
| ३. | काय आदेश ? | **...आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.** |

## कारणमिमांसा

८. अभियोग पक्षाने स्वतःचे म्हणणे सिध्द करण्यासाठी फिरोज अमीन मुलाणी, फिर्यादी (नि.क्र.१८) याला तपासण्यात आले. फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र.१७ वर त्याची आपसांत न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे त्यामुळे खटला पुढे चालविण्याचा नाही अशी पुरसिस दिली आणि नि.क्र.२० वर कोणतेही साक्षीदार तपासावयाचे नाहीत अशी पुरावा बंद करण्याची पुरसिस अनुक्रमे दाखल केली आहे. त्यानुसार नि.क्र.१ वर आदेश करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

९. फिर्यादीच्या साक्षीमध्ये आरोपीला दोषी धरण्याइतपत कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नसल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन अनावश्यक (dispense with) करण्यात आला आणि तसा आदेश नि.क्र.१ वर करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ व २ करिता,</u>**

**१०.** फिर्यादीने आपल्या सरतपासात(नि.१८) असे नमूद केले आहे की,आरोपी आणि त्याच्यामध्ये गाडीच्या संदर्भात व्यवहार झाला होता. आरोपी हा फिर्यादीची गाडी घेवून गेला होता परंतु त्याचे पैसे दिले नव्हते. त्यामुळे त्याने फिर्याद दाखल केली. फिर्यादीमधील मजकुराविषयी त्याला माहिती नाही असे सांगितले. फिर्यादीने सरकार पक्षाला सहकार्य न केल्यामुळे सरकार पक्षातर्फे त्याचा उलटतपास घेण्यात आला. तयामध्ये त्याने आरोपी कार घेवून गेला होता असे सांगितले परंतु आरोपीने भंगारमध्ये कार विकली आणि त्याची फसवणूक केली या सुचक प्रश्नांस नकार दिला. आरोपीविरुध्द फिर्यादीने काहीही सांगितले नाही. त्याची आणि आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे हे त्याने मान्य केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात आरोपीमध्ये व त्याच्यामध्ये कोणताही पैशांचा व्यवहार शिल्लक राहिला नाही, आरोपीविरुध्द त्याची कोणतीही तक्रार नाही, आणि त्याला खटला पुढे चालविण्याचा नाही, या सर्व बाबी त्याने मान्य केल्या.

**११**. वरील साक्षीपुराव्यावरुन असे स्पष्ट होते की, फिर्यादी व आरोपी यांची तडजोड झालेली असल्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द काहीही सांगितलेले नाही. त्यामुळे आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. सबब मुद्दा क्र.१ व २ यांचा निष्कर्ष नकारार्थी देण्यात येतो आणि त्याअनुषंगाने मुद्दा क्र.३ चे उत्तर येते त्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे,

**<u>आदेश</u>**

**१.** आरोपी याची भारतीय दंड सहीता,१८६० चे कलम ४०६ व ४२० नुसार ठेवलेल्या गुन्ह्यांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसार जामीन दयावा.

Digitally signed by KASHYAP MANGAL DEEPAK
Date: 2026.08.13 12:42:29 +0530

कोल्हापूर. **(मंगल दीपक कश्यप)**

दिनांकः १३.०८.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.